दि. २२/११/२०२२

प्रजावाणी

# पोलिसांच्या कोंबिंग ऑपरेशनमध्ये सापडले दोन गावठी पिस्टल आणि तलवारी



नांदेड, दि. २१ : पोलिसांनी शहर परिसरात केलेल्या कोंबिग ऑपरेशन दरम्यान पोलिसांनी जवळपास शंभराच्या वर आरोपींची तपासणी करून त्यात रेकॉर्डवरील फरार असलेल्या पाच आरोपींना अटक तर नॉन बेलेबल वॉरंटमधील १३ आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले. अचानकपणे सुरू केलेल्या कोंबिंग ऑपरेशनमध्ये पोलिसांनी दोन गावठी पिस्टल, खंजर तसेच तलवारी जप्त करण्यात आल्या.

शहरातील फरार व रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांना जेरबंद करण्यासाठी तसेच जबरी चोरी, अग्नीशस्त्र बाळगणारे, घातक शस्त्र बाळगणारे, दरोड्यातील फरार आरोपी, समन्स वॉरंट, पोटगी वॉरंट, यासारख्या आरोपींच्या शोध मोहीम व गुन्हे प्रतिबंध अनुषंगाने पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या आदेशावरून २१ नोव्हेंबरच्या पहाटे कोंबिंग ऑपरेशन राबविण्यात आले. या ऑपरेशनमध्ये दोन पिस्टल, तीन तलवारी यासह काही संशयितांना ताब्यात घेतले. विशेष म्हणजे सुमारे ६ ते ७ तास राबविण्यात आलेल्या कोंबिंग ऑपरेशनच्या कालावधीत पोलीस अधिक्षकासह पोलिसांचा मोठा फौजफाटा ठिकठिकाणी तपासणी करत होते. शहरातील सहा पोलीस ठाणे हद्दीत सदरचे ऑपरेशन राबविण्यात आले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या अधिपत्याखाली विविध पथके तयार करून मोहीम राबविण्यात आली. कोंबिंग ऑपरेशनसाठी एकूण पाच पोलीस उपविभागीय अधिकारी, सात पोलीस निरिक्षक, ३४ सहाय्यक पोलीस निरीक्षक, १५० पोलीस अंमलदार, ६० पंच व कॅमेरेमन असा ताफा तपासणीसाठी तैनात करण्यात आला होता. दरोडा, जबरीचोरी, घरफोडी करणारे एकूण ७० आरोपींची झडती घेण्यात आली. शस्त्र अधिनियम अंतर्गत गुन्हे करणारे एकूण ३५ आरोपींची तपासणी करण्यात आली. रेकॉर्डवर असलेले परंतु फरार असलेल्या एकूण पाच जणांना अटक करण्यात आली. तसेच नॉन बेलेबल वॉरंटमधील १३ आरोपींना ताब्यात घेण्यात आले. अनेक गुन्हेगारांचा शोध घेत असताना 'एलसीबी'च्या पथकाने तीन तलवारी, दोन गावठी पिस्टल एक खंजर जप्त करून चार आरोपींना ताब्यात घेतले. इतवारा पोलीस ठाणे अंतर्गत एक तलवार जप्त करून आरोपीवर कारवाई करण्यात आली. यावेळी पोलिसांनी आठ प्रोव्हीजन रेड करून पासष्ट हजार रुपयाचा माल जप्त करण्यात आला. तसेच तीन बेवारस वाहने जप्त केली.

सदरच्या कोंबिंग ऑपरेशन दरम्यान पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्यासह अति.पो. अधिक्षक अविनाश कुमार, स.पो. अधिक्षक शफकत आमना, पो.उप. अधिक्षक सिद्धेश्वर मोरे, पो.उप अधिक्षक चंद्रसेन देशमुख, अधिक्षक सचिन सांगळे, पो.उप. अधिक्षक विक्रांत गायकवाड, 'एलसीबी'चे पो.नि. द्वारकादास चिखलीकर, तसेच पो.नि. सुधाकर आडे, पो.नि. जगदीश भंडरवार, पो.नि. भगवान धबडगे, पो.नि. अनिरुद्ध काकडे, पो.नि. अशोक घोरबांड, पो.नि. काशीकर यांच्यासह सपोनि, पोउपनि, पोलीस कर्मचारी मोठ्या संख्येने कोंबिंग ऑपरेशनमध्ये सहभागी झाले होते.